# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९५-२३** **दिनांक :- २३/०३/२०२३**

## बाल मजुरांकडुन काम करुन घेणाऱ्या अरोपीतांवर कारवाई करुन ०२ बाल मजुरांची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर पथकाची कामगिरी.

दिनांक २१/०३/२०२३ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ५/बी, बी.के प्लास्टीक कंपनी व गाळा नं. डि/४, प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, भाईंदर पुर्व या दोन्ही कंपनीचे चालक/मालक व मॅनेजर असे त्यांचे कंपनीमध्ये अल्पवयीन मुलांना अनधिकृतपणे कामावर ठेवून त्यांचेकडून सक्तीने बेकायदेशीरपणे जिवीतास धोका निर्माण होईल असे काम करुन घेत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन स.फौ. उमेश पाटील व स्टाफ तसेच पंचासह ५/बी, बी.के प्लास्टीक कंपनीमध्ये एक अल्पवयीन मुलगा व गाळा नं. डि/४, प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, नवघर, भाईंदर पुर्व येथे एक अल्पवयीन मुलगा हे वर नमुद कंपनीमध्ये स्टील वाटी व स्टील चहा कपास हॅन्डल बसविण्याचे काम प्रेस मशीनवर करीत असतांना निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी दु. १४.४० वा. छापा कारवाई करुन ०२ अल्पवयीन मुलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने ताब्यात घेण्यात आले. सदरबाबत बी.के. कंपनीचे मालक/चालक बौतुला सत्तार खान तसेच प्रिन्स मेटल कंपनीचे मॅनेजर जोखन मुन्नीलाल प्रसाद व मालक पाहिजे अरोपीत नथुनराम पुरोहित यांचेविरुध्द म.पो.अंम अश्विनी शहाजी भिलारे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I २१७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७४, ३४ सह बाल व किशोरवयीन (प्रतिबंध) सुधारीत कायदा २०१६ चे कलम ३ (ए) सह बाल न्याय अधिनियम ७५,७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, म. पो.अंम. अश्विनी भिलारे, म.स.ुब. अपर्णा गायकवाड सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

**-------000------**